# भजन

**।। कृष्णातुज भाडभीड ।।**

कृष्णा तु भाडभीड मुळी नाही ।
घेऊनिया गोपाळासी जाऊनिया चो-या करीसी ।
चीची हो बोल ऐकुन कमळे देतो कोण ।
मदन मारी मारी मग प्राण तारी तारी ।।
मंदीरी येतील नारी, मग प्राण तारी तारी ।
हा तन-मन-धन तुज अर्पण करीतो, आजपासूनी प्यारी ।

**।। गजर ।।**

सावर सावर अंबाबाई पैठणीचा घोळ ग (२)
पैठणीचा घोळ ग, अंबा माता खेळ ग (२)

शंकराच्या सवे तु सारीपाट खेळ ग (२)
सारीपाट खेळ ग, अंबा माता खेळ ग (२)

गोरी गोरी काया तुझी, पायी पैंजण चाळ ग (२)
पायी पैंजण चाळ ग, अंबा माता खेल ग (2)

**।। चिंचेच्या पानावर ।।**

चिंचेच्या पानावर देऊळ रचिले ।
आधी कळस मग पाया रे ।।
देवपूजा जाता देऊळ उडाले ।
परी कैसी सदगुरु राया रे ।।१।।
आंधळ्याने देखिले बहि-याने ऐकिले ।
पांगळ्याने पाठलाग केला रे ।।२।।

दुतोंडी हरिणी पाण्यावरी आली ।
ती मुखविणे पाणी प्याली रे ।।३।।
एका जनार्दनी एकपणे विणवी ।
अखंड रामनाम स्वरा रे ।।४।।

**।। पावना वामना यामना ।।**

पावना वामना यमना ।
दे तव भजनी निरंतर वासना ।।
भो प्रल्हाद प्रल्हाद हरी रुपा
मातला निशाचर कुंदना
दे तव भजनी निरंतर वासना
श्रीधरा श्रीकरा श्रीवरा हे मन रंगले
समार्जनी श्रीधरा

**।। मंगलनामा मंगलधामा ।।**

मंगलनामा मंगलधामा प्रभुचि सदया मंगलनामा
प्रभुची सदया मंगलधामा
देवदयेने आज पातला सौख्याचा दिन
शास्त्र गणाला - मंगलनामा ।।१।।
विनित हृदये हरी चरणाला
निजसुमनांचा हार वाहिला - मंगलानामा ।।२।।
तव प्रेमाच्या घन छायेला
हरी देई सुख शांती गणाला - मंगलनामा ।।३।।

**।। या रे नाचू अवघे जन ।।**

या रे नाचू अवघे जन
भावे प्रेमे परिपूर्ण ।।धृ।।
गाऊ पंढरीचा राणा
क्षेमदेऊ संतसंजना ।।१।।

पापे पकाले पकाले बापूडी
काळ झाला देशोधडी ।।२।।
प्रेम वाटीतो उधार ।
देत नाही सान थोर ।।
तुका म्हणे धन्यकाळ ।
आजीचा प्रेमाचा सुकाळ ।।

**।। श्री भार्गवरामाचें भजन ।।**

स्फटीकाचें सिंहासन । वरि वैसे भृगुनंदन ।।धृ०।।
बाजूला काल काम । मागें माता करि रक्षण नेसले पीतांबर । यज्ञोपवीत सुंदर ।।१।।
कीरीट शीरावर । कुण्डलें मकराकार ।। परश चाप हाती पायीं नुपुरे गर्जती ।।२।।
विठु म्हणे द्विजवर करितों मी नमस्कार ।।३।।